# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
SENIOR SECONDARY| CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL
**ANNUAL EXAMINATION 2024-25**
**MARATHI**

Class : IX | Duration : **3** Hrs
Date : 18.02.2025 | Max. Marks : **80**
Admission No.: | Roll No.:

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

(1) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.
(2) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 :– (आकलन ) (अ) अपठित गद्यांश :–**

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती'उक्तीप्रमाणे या जगातील समाजातील सर्वच लोकांचा उद्धार व्हावयाचा असेल तर संतांना, समाज सुधारकांना जन्म घ्यावा लागतो. त्यांना आपले आयुष्य जगाच्या कल्याणासाठी खर्च करावे लागते. महात्मा फुले हे त्यातलेच एक थोर विचारवंत आणि समाजसुधारक होते. वाहत्या प्रवाहा बरोबरच लाकूड,ओंडके,पालापाचोळा आणि मृत जनावरे वाहत असतात. पण प्रवाहाच्या विरूध्द दिशेने मासे पोहत असतात. याच सिध्दांतावर आधारित फुल्यांचे जीवन होते. तत्कालीन परिस्थिती अनुकूल नसतानाही नव्या कल्पना समाजासमोर मांडल्या आणि त्या समाजाला स्वीकारायला भाग पाडले .

अठराव्या शतकाच्या पूर्वाधात म्हणजे 1827 साली पुण्यात जन्मलेल्या फुल्यांनी जातिव्यवस्था व वर्णव्यवस्थेवर कडकडून हल्ला केला. जोपर्यंत समाजातील जातिव्यवस्था आणि वर्णव्यवस्थाचा बिमोड होत नाही तोपर्यंत समताधिष्ठित समाजव्यवस्थेची निर्मिती होणे अशक्य आहे असा विचार त्यांनी परखडपणे मांडला अशी भूमिका मांडणारे ते पहिले भारतीय होते.

त्याकाळी समाज अज्ञान,अंधश्रध्दा,अनिष्ठ प्रथा, केशवपन यांसारख्या भयानक विकृतीने ग्रासला होता. स्त्रियांना दुय्यम स्थान होते त्यांचे स्वातंत्र हिरावून घेतल्यामुळे गुलामगिरीचे जीवन जगावे लागत असे. फुल्यांनी तत्कालीन समाजाचे अवलोकन केले आणि स्त्रीच्या आणि अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचण्याचे ठरविले वयाच्या अवघ्या 21 व्या वर्षी म्हणजे 1847 साली मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा काढली.महात्मा फुल्यांनी स्वतःच्या पत्नीला म्हणजे सावित्रीबाई फुले यांना साक्षर करून मुलींच्या शाळेवर शिक्षिका म्हणून नेमणूक केली. त्याच्या कार्य प्रेरणेतून सावित्रीबाई फुले भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ठरल्या.

**प्र 1 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा –** **(4X1=4)**

1 प्रवाहाच्या विरूध्द दिशेने पोहत असतात .

**अ** पालापाचोळा **ब** मासे
**क** ओंडके **ड** लाकूड

2 मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा कोणी काढली ?

**अ** सावित्रीबाई फुले **ब** लोकमान्य टिळक
**क** न्या.रानडे **ड** महात्मा फुले

3 भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका कोण होत्या?

**अ** लक्ष्मीबाई टिळक **ब** पंडिता रमाबाई
**क** सावित्रीबाई फुले **ड** आनंदीबाई जोशी

4 त्या काळी समाजात स्त्रियांना कसे स्थान होते?

**अ** दुय्यम **ब** मानाचे

**क** अभिमानाचे **ड** चांगले

**प्र 1 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन) (3X1=3)**

1 संत समाज सुधारकांचा जन्म कशासाठी असतो ?

2 महात्मा फुले यांना समाजात कोणती गोष्ट हवी होती ?

3 वरील उताऱ्यामध्ये कोणती उक्ती आली आहे ?

4 महात्मा फुले कोणत्या साली जन्मले ?

**प्र 1(क) उताऱ्याच्या आधारे खालील प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा :–(कोणताही एक) (1X2=2)**

1 महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आयुष्य वेचण्याचे का ठरवले ?

2 महात्मा फुले यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले कार्य सांगा ?

**प्र 2:– (आकलन ) अः– अपठित पद्यांश :–**

माझ्या गोव्याच्या भूमीत
गडया नारळ मधाचे
कडया–कोपऱ्यामधून
घट फुटती दुधाचे!!

माझ्या गोव्याच्या भूमीत
आंब्या–फणसाची रास
फुली फळांचे पाझर
फळी फुलांचे सुवास!!

माझ्या गोव्याच्या भूमीत
उन्हाळयात खारा वारा
पावसात दारापुढे
सोन्याचांदीच्या रे धारा!!

माझ्या गोव्याच्या भूमीत
येते चांदणे माहेरा
ओलावल्या लोचनांनी
भेटे आकाश सागरा!!

**प्र 2 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडा :– (कोणतेही तीन) (3X1=3)**

**1** कवीने कडया–कपाऱ्यातील पाण्याला कशाची उपमा दिली आहे?

**अ** मधाची **ब** दुधाची

**क** अमृताची **ड** रसाची

**2** गोव्याच्या भूमीत उन्हाळयात कोणते वारे वाहते?

**अ** गार वारे **ब** उष्ण वारे

**क** खारे वारे **ड** थंड वारे

**3** कवीच्या मते माहेरा कोण येत आहे?

**अ** चंद्र **ब** आकाश

**क** तारे **ड** चांदणे

**4** गोव्याच्या भूमीत कशाचे पाझर फुटत आहेत?

**अ** पानांचे **ब** फुलांचे

**क** फळांचे **ड** कळयांचे

**प्र 2 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन) (3X1=3)**

1 कवीने कोणत्या भूमीचे वर्णन केले आहे?
2 गोव्याच्या भूमीत कोणत्या फळांची रास आहे?
3 गोव्याच्या भूमीत कोणत्या प्रकारचे नारळ आहे?
4 ओलावलेल्या लोचनांनी सागरास कोण भेटत आहे?

**विभाग :– ब ( 20 गुण)**

**प्र 3 (अ) सुचनेप्रमाणे उत्तरे लिहा :– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

1 खालील पैकी विशेष नामाचा योग्य पर्याय कोणता ?
**अ** कावेरी **ब** नदी
**क** पर्वत **ड** झाड

2 विठोबाच्या गळयामध्ये तुळसीहार आहे .(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)
**अ** क्रियाविशेषण अव्यय **ब** विशेषण
**क** शब्दयोगी अव्यय **ड** सर्वनाम

3 गरीब माणसाला मी एक सदरा दिला,–––त्याला जेऊ घातले.(रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्यय भरा )
**अ** परंतु **ब** पण
**क** शिवाय **ड** म्हणून

4 मी त्याला विचारले,आई कोठे गेली.त्याने मला स्वतःहा उत्तर दिले. (या वाक्यात किती सर्वनामे आहेत.)
**अ** चार **ब** सहा
**क** तीन **ड** पाच

5 अहाहा!किती सुंदर पक्षी . ( आधोरेखित शब्दाची जात ओळखा)
**अ** विशेषण **ब** क्रियापद
**क** उद्‌गारार्थी **ड** सर्वनाम

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 खालीलपैकी कोणते वाक्य भूतकाळातील आहे ?
**अ** काका समाज सुधारक होते. **ब** काका समाज सुधारक असतील.
**क** काका समाज सुधारक होतील. **ड** काका समाज सुधारक आहेत.

2 मला परीक्षेची भीती वाटते. (काळ ओळखा )
3 राधा पुस्तक वाचत होती. (भविष्यकालिन वाक्य तयार करा. )
4 कुल्लू मनाली हे एक सुंदर स्थान आहे.(काळ ओळखा)

**प्र 3 (क)सुचनेप्रमाणे उत्तरे लिहा :–( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 'तू फार चतुर आहेस.'या वाक्याचे उद्‌गारार्थी वाक्य कोणते ?
**अ** किती चतुर आहेस तू! **ब** छान चतुर! आहेस तू.
**क** फार चतुर आहेस !तू **ड** आहेस तू!चतुर फार

2 मुलांनों खाली बसा. ( या वाक्याचा प्रकार ओळखा)
3 रामू चांगला नोकर आहे. ( नकारार्थी करा )
4 घरी कोण पाहुणे आले आहेत?(वाक्याचा प्रकार ओळखा)

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 समानार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती ?
**अ** खरे– खोटे **ब** खरे–सत्य
**क** खरे–खुरे **ड** खरे–खोटारडे

2 **झाड** या शब्दाचा समानार्थी शब्द निवडा

**अ** –फांदया **ब** –फळ
**क** –फूल **ड** –वृक्ष

3 समानार्थी शब्दानुसार गटात न बसणारा शब्द कोणता ?

**अ** –सूर्य **ब** –चंद्र
**क** –शशी **ड** –मयंक

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 विरूध्दार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती ?

**अ** –प्रेम –व्देष **ब** – प्रेम –करूणा
**क** प्रेम –व्देषी **ड** –प्रेम – खुणस

2 प्रकाश या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द निवडा :–

**अ** – उजेड **ब** – उजाला
**क** – अंधार **ड** –अंधेरा

3 **अबोल** या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द निवडा :–

**अ** –मुका **ब** –बोलका
**क** –मूक **ड** –बधीर

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 भिन्नलिंगी शब्दाचा पर्याय ओळखा :–

**अ** गाय **ब** मेंढी
**क** बकरी **ड** बैल

2 पक्षी या शब्दांचे लिंग बदला होईल ?

**अ** खग **ब** पक्षीण
**क** पाखरू **ड** पक्षीन

3 स्त्री या शब्दांचे लिंग बदला होईल ?

**अ** मनुष्य **ब** माणूस
**क** पुरूष **ड** स्त्रिया

**प्र 4 (क) वचन बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 पुस्तक – या शब्दाचा अनेकवचनी शब्द लिहा. .

2 आकाश – या शब्दाचा अनेकवचनी शब्द लिहा.

3 वीज – या शब्दाचा अनेकवचनी शब्द लिहा.

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

1 पुढील शब्दाचा समास ओळखा – चहापाणी

**अ** इतरेतर द्वंद्व **ब** द्विगु
**क** समाहार द्वंद्व **ड** वैकल्पिक द्वंद्व

2 पुढील शब्दाचा समास ओळखा – नवरात्री

**अ** अव्ययीभाव **ब** द्विगु
**क** समाहार द्वंद्व **ड** वैकल्पिक द्वंद्व

3 खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता –

**अ** बेईमान **ब** त्रिभुवन
**क** बेसावध **ड** बेलगाम

**विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)**

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन)** **(3X1=3)**

1 सखू आजी पाठात गावच्या कोणत्या जत्रेचा उल्लेख आला आहे?

2 भारतातील सुप्रसिध्द हॉकी खेळाडूचे नाव काय होते?
3 कशातून दिव्याच्या शोधाची बातमी जगभर पसरली ?
4 लेखक शंकर खरात पुढील शिक्षणासाठी कोठे जाणार होते?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा (कोणतेही तीन) (3X1=3)**

1 त्याच दिवशी मी खूप नवे ---- शिकून घेतले.
2 श्री ---- मास्तर मला मराठी पाचवीत होते .
3 बलाकांच्या स्थलांतराविषयी ------- वाड्.मयात उल्लेख आढळतो.
4 अमेरिकेच्या-- खात्याने दिव्याचे चित्र असणारी तिकिटेही प्रसिध्द केली.

**प्र 5 कः- खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः- (1X3=3)**

1 तुमच्या मते रेल्वे प्रवासाचे असलेले फायदे व तोटे सविस्तर लिहा?
2 पक्षी निरीक्षणातून पक्ष्यांच्या जीवनपद्धतीसंबंधी तुमची मते सविस्तर लिहा
3 शिक्षक व विदयार्थी यांच्यातील नातेसंबंधाविषयी तुमच्या संकल्पना स्पष्ट करा-

**प्र 5 ङः- वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्य पुन्हा लिहा :- (5X1=5)**

**( गलका करणे/साकार करणे/ मन लागणे/आर्जव करणे/खटाटोप करणे)**

1 गुरुजींच्या चांगल्या शिकवणीमुळे सुजलला अभ्यास आवडू लागला.
2 शिक्षक वर्गात नसल्यामुळे मुलांनी वर्गात गोंधळ केला.
3 कलेक्टर बनून रामने बाबांचे स्वप्न पूर्ण केले. .
4 रामूने सुट्टीसाठी आपल्या मालकाला विनवणी केली.
5 चांगले गुण मिळविण्यासाठी राधाने खूप प्रयत्न केला.

**प्र 6 अ :- (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः- ( कोणतेही चार ) (4X1=4)**

1 काळया मातीत काय चालत आहे ?
2 पुन्हा एकदा काय चमकावी असे कवयित्री प्रतिमा इंगोले यांना वाटते?
3 कोणत्या ऋतूचे स्वागत करण्यासाठी सृष्टी सज्ज आहे?
4 दुरंगी चुनरीत कोण उभी आहे?
5 वारकरी पंथाच्या इमारतीचा पाया कोणी रचला?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :-(कोणतेही चार) (4X1=4)**

1 तुका झालासे --- भजन करा सावकाश.
2 व्यायाम ---- मित्र।हे ध्यानी ठेवावे सूत्र.
3 आंब्याच्या मोहरातून आली---- सुरेल तान.
4 संतकृपा झाली इमारत ---- आली.
5 काटा पायात रुतते लाल रगत सांडते हिर्व --- फुलते .

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण कराः-(कोणतेही एक) (1X3=3)**

1 पुन्हा एकदा घालीत पिंगा
पावसाच्या सरी व्हाव्यात बेभान
कोसळाव्या खाली मातीत माती व्हावी एक

**किंवा**

व्यायामे वाढे प्रतिकार शक्ति।स्वावलंबनाची प्रवृत्ति
व्यायामे अंगी वाढे स्फूर्ति। कार्य करण्याची

**प्र 7 अ स्थूलवाचन :- एका वाक्यात उत्तरे लिहा :- ( कोणतेही तीन ) (3X1=3)**

1 आसामात प्रतीक म्हणून जागोजागी कोणाचे पुतळे उभारलेले आढळतात?
2 कोणती भाषा शब्दकोडयांसाठी सर्वात सोईस्कर आहे?

3 विश्व कोशाचा पहिला खंड केव्हा प्रकाशित झाला ?

4 मराठी विश्वकोशाच्या निर्मितीत कोणाचे योगदान अत्यंत मोलाचे आहे?

**प्र 7 (ब) खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर 40ते 50 शब्दात लिहा :– (1X2=2)**

1 केशभूषेचे उद्देश सांगून त्यात कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो,ते स्पष्ट करा –

2 काझीरंगा ही कर्दमभूमी आहे हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

## विभाग– ड लेखन– (गुण 15)

## लेखन

**प्र 8 अ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा :– (1X6=6)**

**1 थंडीतील सकाळ**

मुद्देः–हिवाळा हा प्रिय ऋतू––– सकाळ सुखद––– गावाकडील सकाळ–– सर्वत्र धुके––– अधूनमधून डोंगर,झाडांचे शेंडे यांचे दर्शन––– पानांचा सडा––– सर्वत्र दव––शहरात लोक रंगीबेरंगी स्वेटर,शाल परिधान करतात–––कधी कधी जाडजूड पांघरूणात लपेटून राहण्याचा आनंद––– हवीहवीशी वाटणारी सकाळ.

**2 परीक्षा रद्द झाल्या तर ............**

**मु**द्दे :– परीक्षेचा त्रास––– परीक्षा रद्द व्हावी–––परिणाम –––योग्य व अयोग्य ठरवणे अशक्य––––परीक्षा हवीच ––––योग्य क्षेत्रात योग्य व्यक्तींची निवड.

**3 शेतकऱ्याचे मनोगत**

मुद्दे :– मी एक गरीब शेतकरी–– शेती हा पारंपारिक व्यवसाय–अहोरात्र कष्ट–बिकट अवस्था–पाऊस न पडणे अतिवृष्टीची टांगती तलवार –शासनाची तुटपुंजी मदत–संरक्षण–बाजारात अडचणी–कर्जबाजारी–शेतकरी सुखी तर देश सुखी .

**प्र 8 (ब) मुद्दयावर आधारित गोष्ट लिहा. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक) (1X5=5)**

शेतकरी –––– रोज एक सोन्याचे अंडे देणारी कोंबडी–––शेतकऱ्याची स्थिती सुधारणे–––शेतकऱ्याला सोन्याची हाव ––––––त्याने कोंबडीला मारणे–––पोटात एकही अंडे नसणे–––पश्चाताप –तात्पर्य .

**किंवा**

एका शाळेत एक शिक्षक –––गणित विषय शिकवत–––घरचा अभ्यास देणे–––एक कठीण गणित घरून सोडवून आणण्यास सांगणे–––दुस–या दिवशी शिक्षक गणित तपासतात–––फक्त एकच विदयार्थाचे गणित बरोबर ––– शिक्षक त्याला शाबासकी देतात–––तो विदयार्थी रडू लागतो––सर्व मुलांना आश्चर्य––विदयार्थाचे उत्तर गणित मी सोडवले नाही मला शाबासकी नको. शिक्षकांना आनंद होतो ते समजूत घालतात –––तात्पर्य.

**प्र 8 (क) पत्र लेखन :– ( कोणतेही एक ) (1X4=4)**

तुम्ही साक्षी/सार्थक दांडेकर ,कुमठेकर मार्ग,पेरूगेट,सांगली–404430 रहिवाशी आहात.तुमच्या भागातील कचराकुंडीतील कचरा खूप दिवस उचललेला नाही तो रस्त्यावर पसरला आहे. त्यामुळे सगळीकडे दुर्गंधी पसरलेली आहे ,यासंबंधी महापालिकेच्या स्वच्छता अधिकाऱ्याकडे तक्रार करणारे पत्र लिहाः–

**किंवा**

रिया/रजत प्रधान, ठाणे विभाग आपल्या परिसरात अनियमित व वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठयाबाबत प्रति, मा. विभागीय अधिकारी,महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळ ठाणे विभाग यांना या संदर्भातील तक्रार पत्र लिहा :–

**::::::::::::::::::::: समाप्त :::::::::::::::::::::::**